प्रेस प्रकाशन PRESS RELEASE

भारतीय रिझर्व्ह बँक
RESERVE BANK OF INDIA

**संचार विभाग,** केंद्रीय कार्यालय, एस.बी.एस.मार्ग, मुंबई-400001
**Department of Communication**, Central Office, S.B.S.Marg, Mumbai-400001
फोन/Phone: 022-22660502

वेबसाइट : www.rbi.org.in
Website : www.rbi.org.in
ई-मेल email: helpdoc@rbi.org.in

ऑक्टोबर 29, 2019

**जनता सहकारी बँक लि. पुणे ह्यांचेवर भारतीय रिझर्व्ह बँकेकडून आर्थिक दंड लागु**

भारतीय रिझर्व्ह बँकेने, (आरबीआय), आदेश दि. ऑक्टोबर 16, 2019 अन्वये, जनता सहकारी बँक लि. पुणे ह्यांना (ती बँक) रु.1 कोटी दंड लागु केला असून तो दंड उत्पन्न ओळख व ॲसेट वर्गीकरण (आरआरएसी) नॉर्म्स, अग्रिम राशींचे व्यवस्थापन व एक्सपोझर नॉर्म्स आणि वैधानिक/इतर निर्बंध ह्यावर आरबीआयने दिलेल्या सूचनांचे अनुपालन न केले गेल्याने लावण्यात आला आहे. आरबीआयने दिलेल्या वरील सूचनांचे अनुपालन वरील बँकेने केले नसल्याचे विचारात घेऊन, बँकिंग विनियामक अधिनियम 1949 च्या कलम 46 (4) (आय) व कलम 56 सह वाचित, कलम 47 अ (1)(क) खाली आरबीआयला देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन हा दंड लावण्यात आला आहे.

ही कारवाई, विनियामक अनुपालनामधील त्रुटींवर आधारित असून, वरील बँकेने तिच्या ग्राहकांबरोबर केलेले व्यवहार किंवा करारांच्या वैधतेशी संबंधित नाही.

**पार्श्वभूमी**

वरील बँकेच्या मार्च 31, 2018 रोजी असलेल्या वित्तीय स्थिती संदर्भात आरबीआयने केलेल्या वैधानिक तपासणीत आढळून आले की, वरील बँकेने, आयआरएसी नॉर्म्स, अग्रिम राशींचे व्यवस्थापन व एक्सपोझर नॉर्म्स आणि वैधानिक/इतर निर्बंध व एटीएम कम डेबिट कार्डे देणे ह्यावर आरबीआयने दिलेल्या सूचनांचे पालन केलेले नाही. वरील बँकेला एक नोटिस पाठवून त्यात, वरील सूचनांचे अनुपालन न केल्याबद्दल तिला आर्थिक दंड का लावला जाऊ नये ह्याची कारणे देण्यात त्या बँकेला सांगण्यात आले होते. ह्यावर त्या बँकेने दिलेले उत्तर व वैय्यक्तिक सुनावणीत केलेली तोंडी सादरीकरणे विचारात घेऊन आरबीआयने निष्कर्ष काढला की, आयआरएसी नॉर्म्स, अग्रिम राशींचे व्यवस्थापन व एक्सपोझर नॉर्म्स व वैधानिक/इतर निर्बंध ह्यावर देण्यात आलेल्या सूचनांचे अनुपालन न केल्याचे वरील दावे सिध्द होत असून त्यासाठी आर्थिक दंड लावणे आवश्यक आहे.

**(योगेश दयाल)**
मुख्य महाव्यवस्थापक

**प्रेस प्रकाशन : 2019-2020/1049**